जानेवारी ८, २००४

**बँकांना चलनी नोटांच्या गड्डयांना पिना मारण्याबद्दल दंड होऊ शकतो : रिझर्व्ह बँक**

रिझर्व्ह बँकेने पुनरुच्चार केला आहे की चलनी नोटांच्या गड्डयांना पिना मारण्यावर संपूर्ण बंदी आहे आणि कोणत्याही बँकेच्या शाखेने पिना मारलेल्या नोटांचे गड्डे देऊ किंवा स्वीकार नयेत. रिझर्व्ह बँकेने पुढे म्हटले आहे की जर कोणतीही बँक अगर बँकेची शाखा पिना मारलेले नोटांचे गड्डे देत अगर स्वीकारत असल्याचे आढळून आले तर तिच्यावर बँकिंग रेग्युलेशन कायदा १९४९ मधील तरतुदींनुसार दंडात्मक कारवाई केली जाऊ शकते.

मागील वर्षी, भारतीय रिझर्व्ह बँकेने, बँकिंग रेग्युलेशन कायदा १९४९ मधील नियम ३५ अनुसार सर्व व्यापारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व स्थानिक बँकांना आदेश पाठविला होता व नोटांच्या गड्डयांना पिना मारण्याचे बंद करुन गड्डे कागदी वेष्टना मध्ये बांधायच्या सूचना दिल्या होत्या. रिझर्व्ह बँकेने जनतेला फक्त स्वच्छ नोटाच देण्यास सांगितले होते आणि नोटांवरील वॉटरमार्कवर काहीही लिहिणे थांबवण्यास सांगितले होते. मात्र रिझर्व्ह बँकेकडे जनतेकडून तक्रारी आल्या होत्या की नागरी सहकारी बँका, राज्य सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकां सहित इतर काही बँका / शाखांनी अजूनही पिना मारलेल्या नोटांचे गड्डे देणे व स्वीकारणे सुरु ठेवले होते. नोटांचे नुकसान करण्याबरोबरच पिना मारण्यामुळे त्यांचे आयुष्य कमी होते, त्या खेरीज ग्राहकांना नोटांच्या गड्डयांना मारलेल्या पिना सहजपणे उघडणे शक्य होत नव्हते.

**अल्पना किल्लावाला**

मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस रिलीज : २००३-२००४/८४१**